MHST050005642025

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | – | ०५/०७/२०२५ |
| नोंदणी तारीख | – | ०७/०७/२०२५ |
| निकाल तारीख | – | १३/०३/२०२६ |
| कालावधी | – | ००व. ०८म. ०६दि. |

**दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कराड, यांचे न्यायालयात**

**( पिठासीन अधिकारी : सु. बा. तोडकर )**

**संप्रमाण अर्ज क्र.११/२०२५** **निशाणी क्र. १९**

श्री. सुनिल शामराव इंगवले.
वय– ६२ वर्षे, धंदा– शेती.
रा. रिसवड, ता. कराड, जि. सातारा.
ह.मु. ५१ तिर्थ अपार्टमेंट, मोहन नगर को. ऑप. ....... **अर्जदार**
हौसींग सोसायटी, प्लॉट नं. सी –१४
बाणेर, सूस पुणे.

**विरुद्ध**

कोणीही नाही. ....... **सामनेवाला**

---

अर्जदारतर्फे विधिज्ञ – श्री. एन. एस. पाटील.

---

## न्यायनिर्णय

(घोषित दि.१३ मार्च, २०२६)

अर्जदार यांनी मयत शामराव यशवंत इंगवले यांनी दि.०४/०४/२०२४ रोजी करुन ठेवलेल्या मृत्यूपत्रावरून प्रोबेट मिळण्यासाठी हा अर्ज दाखल केला आहे.

**अर्जदार यांचे कथन थोडक्यात खालीलप्रमाणे आहे** –

०२. अर्जदार हे मौजे रिसवड, ता. कराड, जि. सातारा येथील रहिवासी व खातेदार आहेत. अर्जदार हे कामधंद्यानिमित्त पुणे येथे राहत असून ते गावी येवून जावून शेतजमिनींची देखभाल करीत असतात. शामराव यशवंत इंगवले हे

दि.१४/०४/२०२५ रोजी पुणे येथे मयत झाले आहेत. अर्जदार मयत शामराव यशवंत इंगवले यांचा मुलगा आहे.

मृत्यूसमयी मयत शामराव यशवंत इंगवले यांच्या मालकी हक्काच्या स्थावर मिळकती खालीलप्रमाणे–

अ) मौजे रिसवड, ता. कराड, जि. सातारा येथील मिळकती खालीलप्रमाणे –

| अ.क्र. | भूमापन क्रमांक | क्षेत्र<br>हे. आर. | आकार<br>रू. पैसे | हिस्सा |
|---|---|---|---|---|
| १ | ३०० | ०.३७.००<br>पो.ख. ०.०९.०० | ४–४१ | ०.०६.१७<br>पो.ख.०.०१.५० |
| २ | ३०३/ब | ०.०४.००<br>पो. ख. ०.०८.०० | ०–२१ | ०.००.२५<br>पो.ख.०.००.५४ |
| ३ | ३०५ | ०.१४.०० | ३–३४ | ०.०२.३३ |
| ४ | ३०९ | ०.३२.०० | १–५० | ०.०५.३३ |
| ५ | ३१८ | ०.०१६.०० | ०–४७ | ०.०२.६७ |
| ६ | ३२३ | २.२८.००<br>पो.ख.०.०३.०० | ३–०० | ०.३८.००<br>पो.ख. ०.०१.०० |
| ७ | ३२४ | ३.३०.०० | ६–०६ | ०.५५.०० |
| ८ | ३३० | ०.५३.००<br>पो.ख. ०.०५.०० | ३–७८ | ०.०८.८३<br>पो.ख.०.०१.०० |
| ९ | ३३१ | ०.०८.०० | ०–२८ | ०.०१.३३ |
| १० | ३३३ | ०.१५.०० | १–८१ | ०.०२.५० |
| ११ | ३६० | ०.२५.०० | १–३४ | ०.०४.१६ |
| १२ | ८९६ | ०.३५.०० | ६–६९<br>३–१९ | ०.०५.८२ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३ | ९०० | ०.०७.०० | १–५० | ०.०१.१७ |
| १४ | ३२५/ब | ४.२८.००<br>पो.ख.०.६८.०० | २–४८ | ०.२२.२९<br>पो.ख.०.०३.५४ |
| १५ | ३०६/ब | ०.३९.००<br>पो.ख.०.१४.०० | १–७० | ०.०२.६४<br>पो.ख.०.००.९४ |
| १६ | ९३६ | ०.१२.०० | २–९७ | ०.०१.०० |
| १७ | ३५३ | ०.५६.०० | ५–६६ | ०.०९.३३ |

ब) मृत्यूसमयी मयत शामराव यशवंत इंगवले यांच्या जंगम मिळकती खालीलप्रमाणे –

१) सह्याद्री सहकारी साखर कारखना लि. यशवंतनगर, शिरवडे, ता. कराड, जि. सातारा येथील कै. शामराव यशवंत इंगवले यांचे नावे असणारे दोन शेअर्स.

२) सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक शाखा मसूर ता. कराड, जि. सातारा येथील मयत शामराव यशवंत इंगवले यांचे नावे असणारे सेव्हींग खात्यातील रक्कम.

३) कॅनरा बँक शाखा नवी मुंबई येथील पेन्शन खाते क्र.२७६६१०१००४४५० व सेव्हींग खाते क्र.२७६६१०१००४४५५ यामध्ये असणारी रक्कम.

०३. वर नमूद कलम ३अ व ३ब मधील जंगम मिळकती या मयत शामराव यशवंत इंगवले यांच्या मालकी वहिवाटीच्या होत्या. अर्जदार हे मौजे रिसवड, ता. कराड येथे राहून शामराव यशवंत इंगवले यांची सेवासुश्रुषा व देखभाल करीत होते. त्यामुळे मयत शामराव यशवंत इंगवले यांना त्यांच्या स्थावर मिळकतीतील हिस्सा व जंगम मिळकतीतील संपूर्ण हिस्सा अर्जदार यांना त्यांच्या मृत्यूपश्चात मिळावा अशी त्यांची अंतिम इच्छा होती. मयत शामराव यशवंत इंगवले यांची अखेरपर्यंत प्रकृती चांगली होती. त्यांची स्मरणशक्ती व समजही चांगली होती. त्यामुळे मयत शामराव यशवंत इंगवले यांनी दि.०४/०४/२०२४ रोजी त्यांनी त्यांचे अखेरचे मृत्यूपत्र व इच्छापत्र करावयाचे ठरविले

व त्याप्रमाणे त्यांनी तयार केलेले टिपणाप्रमाणे दि.०४/०४/२०२४ रोजी त्यांचे मर्जीप्रमाणे मृत्यूपत्राचा लेख टंकलिखित करून घेतला. श्री. चंद्रशेखर विठ्ठल तांबडे, रा. सानपाडा, नवी मुंबई व श्री. संजय हरीश्चंद्र पानसरे, रा. सानपाडा, नवी मुंबई यांना बोलावून त्यांचे समक्ष त्या लेखाखाली सही केली व त्यांना मृत्यूपत्रावर साक्षीदार म्हणून सही करणेस सांगितली. त्यानंतर दि.१४/०४/२०२५ रोजी शामराव यशवंत इंगवले हे वृध्दापकाळामुळे मृत्यू पावले आहेत. त्यांचा अंतिम संस्कार व सर्व अंत्यविधीही अर्जदार यांनीच केला आहे.

०४. मयत शामराव यशवंत इंगवले यांनी मृत्यूपूर्वी अन्य कोणत्याही लेखाने त्यांचे दि.१४/०४/२०२४ रोजीचा अंतिम रजि. मृत्यूपत्राचा लेख रद्द केलेला नाही अथवा अन्य लेख केलेला नाही. दि.०४/०४/२०२४ रोजीचे मृत्यूपत्र हेच मयत शामराव यशवंत इंगवले यांचे अंतिम मृत्यूपत्र आहे. सदर लेखाद्वारे अर्जदार हेच वर नमूद सर्व मिळकतीचे मालक झाले असून तशी त्यांची वहिवाट आहे. मृत्यूपत्राप्रमाणे वर नमूद स्थावर व जंगम मिळकतीबाबत ग्रामसेवक व गावकामगार तलाठी, रिसवड, ता. कराड व जंगम मिळकतीबाबत, बँक अधिकारी यांचेकडे विचारणा केली असता त्यांनी प्रोबेट दाखला न्यायालयाकडून आणणेस सांगितला. सदरचे मृत्यूपत्राप्रमाणे त्यात उल्लेखिलेल्या मिळकतीचा एकमेव कार्याधिकारी म्हणून अर्जदार यांना त्यांनी मिळकती दिलेल्या आहेत. सदर मिळकती मृत्यूपत्राने अर्जदार यांना देण्याचा त्यांना हक्क व अधिकार होता. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज प्रोबेट मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

०५. अर्जाच्या पृष्टयर्थ अर्जदार यांनी दैनिक ''तरूण भारत'' सातारा या वृत्तपत्राची दि.१६/१०/२०२५ रोजीच्या आवृत्ती मध्ये प्रसिद्ध करण्यात आलेली जाहीर नोटीस नि.क्र.९/१ व घोषणा/दवंडी चा बेलिफ अहवाल नि.क्र.१० वर दाखल केलेला आहे.

०६. सदर दवंडीस व जाहिर नोटीसीला प्रतिसाद देवून या अर्जास हरकत घेण्यास ति-हाईत इसम कोणीही न्यायालयात हजर झालेले नाहीत.

०७. अर्जदाराच्या अर्जातील कथनांवरून व दाखल कागदपत्रावरून खालील मुद्दे निश्चित केले असून सदर मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष त्याखाली दिलेल्या कारणांसह मी खालील प्रमाणे नमुद करत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
| --- | --- | --- |
| १. | मयत शामराव यशवंत इंगवले यांनी दि.०४/०४/२०२४ रोजी नोंदणीकृत मृत्यूपत्र केल्याचे अर्जदार सिध्द करतात काय ? | **... होय.** |
| २. | मयत शामराव यशवंत इंगवले यांनी दि.०४/०४/२०२४ रोजी केलेले नोंदणीकृत मृत्यूपत्र खरे आहे काय ? | **... होय.** |
| ३. | अर्जदार प्रोबेट मिळण्यास पात्र आहेत काय ? | **... होय.** |
| ४. | काय आदेश व हुकूमनामा ? | **अंतिम आदेशाप्रमाणे.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र. १ ते ४ करीता –**

०८. या अर्जाच्या पृष्टयर्थ अर्जदार यांनी अ.सा.क्र.१ सुनील शामराव इंगवले यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१३, अ.सा.क्र.२ श्री. चंद्रशेखर विठ्ठल तांबडे – मृत्यूपत्राचे साक्षीदार यांचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्र नि.क्र.१४ वर नोंदविलेल्या आहेत. तसेच शामराव यशवंत इंगवले यांचे मृत्यूपत्राचा दाखल्याची दि.२५/०४/२०२५ ची मूळ प्रत नि.क्र.६, मयत शामराव यशवंत इंगवले यांनी दि.०४/०४/२०२४ रोजी केलेले मूळ मृत्यूपत्राची प्रत नि.क्र.१५ दाखल केलेले आहे. तसेच अर्जात नमूद केलेल्या कारखान्याचे मूळ सभासद कार्ड, कॅनरा बँकेचे मूळ पासबुक, शामराव यशवंत इंगवले यांचे मूळ मृत्यूप्रमाणपत्र, मौजे रिसवड येथील गट क्र.३००, ३०३/ब, ३०५, ३०९, ३१८, ३२३, ३२४, ३३०, ३३१, ३३३, ३६०, ८९६, ९००, ३२५/ब, ३०६/ब, ९३६ व ३५३ चे ७/१२ चे उतारे नि.क्र.१७ चे वर्णन यादीसमवेत दाखल केलेले आहेत. अर्जदार यांच्यातर्फे जादा पुरावा देणे नाही अशी पुरसिस नि.क्र.१८ वर दाखल आहे.

०९. अर्जदार यांनी मूळ अर्जातील कथनांची पुनरावृत्ती त्यांच्या सरतपासाच्या शपथपत्रात नि.क्र.१३ मध्ये केलेली आहे. अ.सा.क्र.२ श्री. चंद्रशेखर विठ्ठल तांबडे यांचे साक्षीमधून मयत शामराव यशवंत इंगवले यांच्या इच्छा व सांगण्याप्रमाणे मृत्यूपत्राचा मसूदा त्यांचे संगणकावर टंकलिखीत केला, त्यावेळी त्यांची शारिरीक स्थिती उत्तम

होती, ते शामराव यशवंत इंगवले यांनी दि.०४/०४/२०२४ रोजी केलेल्या शेवटच्या मृत्यूपत्राचे साक्षीदार आहेत या बाबी समोर आलेल्या आहेत. नि.क्र.१५ वर दाखल असलेल्या मृत्यूपत्रावरून मृत्यूपत्र करतेवेळी शामराव यशवंत इंगवले यांची मानसिक व शारिरीक स्थिती उत्तम होती, याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र मृत्यूपत्राला जोडलेले दिसून येते. तसेच सदरचे मृत्यूपत्रामध्ये अर्जात नमूद करण्यात आलेल्या स्थावर व जंगम मिळकतीदेखील नमूद केल्याचे दिसून येते. सदरचे मृत्यूपत्र हे सह. दु. निबंधक वर्ग क्र.३ ठाणे यांच्याकडे ५४८१/२०२४ या क्रमांकाने नोंदविलेले दिसून येते. सदरचे साक्षीदाराचे साक्षीमधून नि.क्र.१५ वर दाखल असलेल्या मृत्यूपत्रामधील मजकूर यथायोग्यरित्या सिध्द झालेला आहे.

१०. अर्जातील कथने व अर्जदार यांनी दाखल केलेला तोंडी व लेखी पुरावा याला अभिलेखावर कोणताही आक्षेप आलेला नाही. तसेच मृत्युपत्र खोटे असल्याचा आक्षेप कोणीही घेतलेला नाही. त्यामुळे अर्जातील कथने व अर्जदार यांच्या तर्फे दिला गेलेला तोंडी व लेखी पुरावा अबाधीत राहिलेला आहे. अर्जदार यांनी मूळ मृत्यूपत्र प्रस्तुत प्रकरणी दाखल केले आहे. त्यामध्ये मृत्यूपत्र करतेवेळी मयत शामराव यशवंत इंगवले यांची मानसिक व शारिरीक प्रकृती व्यवस्थीत होती असे साक्षीदाराने सांगितलेले आहे. मृत्यूपत्र व त्यामधील मजकूर अर्जदार यांनी साक्षीदारामार्फत यथायोग्यरित्या सिध्द करून घेतले आहे. सबब, अर्जदार यांनी मयत शामराव यशवंत इंगवले यांनी अर्जात नमूद केलेल्या शेत जमिनी, बचत खात्यातील रकमा वगैरे बाबत केलेले मृत्यूपत्र यथायोग्यरित्या सिद्ध केले आहे. त्यामुळे अर्जातील कथने, तोंडी व लेखी पुरावा व कायदेशीर तरतूदी यांचा विचार करता अर्जदार हे सदर मृत्युपत्राबाबतचे प्रोबेट मिळण्यास पात्र आहेत. म्हणून मी मुद्दा क्र.१ ते ३ होकारार्थी उत्तरीत करून मुद्दा क्र.४ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## :: आदेश ::

१. अर्ज मंजूर केला आहे.

२. मयत शामराव यशवंत इंगवले यांनी दि.०४/०४/२०२४ रोजी सुनील शामराव इंगवले यांचे लाभात केलेल्या मृत्यूपत्राचे प्रोबेट भारतीय वारसा कायदा १९२५ चे कलम २८९ प्रमाणे त्यांचे नावे देण्यात यावे.

३. सदरचे प्रोबेट हे अर्जदार यांना त्यांनी महाराष्ट्र न्यायालयीन शुल्क कायदा १९५९ चे कलम १० चे परिशिष्ट १ नुसार योग्य ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर देण्यात यावे.

SUDHIR BALASAHEB TODKAR
Digitally signed by SUDHIR BALASAHEB TODKAR
Date: 2026.03.13 18:11:09 +0530

दिनांक – १३/०३/२०२६ (सु. बा. तोडकर)

स्थळ – कराड दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, कराड.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per the original.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | V. C.Nakate. |
| Court name | : | Civil Judge Sr. Division, Karad |
| Date | : | 13/03/2026 |
| Signed by P O on | : | 13/03/2026 |
| Uploaded on | : | 13/03/2026 |